# नुतन गावपुढाऱ्यांना ग्रामविकासाची संधी

महाराष्ट्रात नुकत्याच ग्रामपंचायतीसाठी निवडणुका पार पडल्या. बारा हजार सातशे अकारा ग्रामपंचायतीसाठी मतदान झाले. सरपंच कोणत्या प्रवर्गाचा होणार हेही जवळपास निश्चित झाले आहे. भारतीय राज्यघटनेच्या ७३ व्या कलमाची दुरूस्ती झाली. त्यामुळे ग्रामपंचायतींना ग्रामसंसदेचा दर्जा मिळाला. सरपंचांना आर्थिक अधिकार मिळाले. गावचा सरपंच हा गावचा मुख्यमंत्रीच असतो. एवढे अधिकार त्याला घटनेने बहाल केले. आता फक्त मिळालेल्या संधीचे सोने करण्याची गरज उरली आहे. त्यासाठी नवनिर्वाचित गावपुढाऱ्यांनी गट — तट विसरून एकत्र यावे. निवडणुकीतील राजकारण आता संपले आहे. राजकरण म्हणजे केवळ सत्तेच्या क्षेत्रात काहीतरी कारभार करणे किंवा निवडणुका लढविणे म्हणजे राजकारण नव्हे, तर समाजपरिवर्तनाचे व व्यक्तीचा विकास घडवुन आणण्याचे ते एक साधन आहे. हे ज्या नेतृत्वाने समजुन घेतले व गावातील सर्व घटकांना सोबत घेऊन काम केले. ती गावे आज प्रगतीपथावर आहेत. यामध्ये ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांचे राळेगणसिध्दी, पोपटराव पवार यांचे हिवरेबाजार, औरंगाबाद जिल्हातील भास्करराव पेरे यांचे पाटोदा आणि बारीपाडा अशा अनेक गावांचा उल्लेख करता येईल. असे सर्वच गावांच्या बाबतीत घडले पाहिजे. त्यासाठी सर्वस्पर्शी, पारदर्शी, सक्षम, कृतीशील व दुरदृष्टीच्या नेतृत्वाची गरज आहे. नवनिर्वाचित गावपुढाऱ्यांनी आपल्यासमोरील हे एक प्रकारचे आव्हान समजुन गावाला सक्षम असे नेतृत्व दिल्यास, सर्व गावे आदर्श ग्राम होऊ शकतात.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आपल्या ग्रामगीतेतील पहिल्या अध्यायातील ४९ व्या ओवीमध्ये म्हणतात,

**गाव हा विश्वाचा नकाशा | गावावरून देशाची परीक्षा |**
**गावचि भंगता अवदशा | येईल देशा ॥ ४९ ॥**

यावरून आपल्याला ग्रामविकासाचे महत्व समजते.

महात्मा गांधीनी आपल्याला 'खेडयाकडे चला' हा संदेश दिला. 'खेडी जोपर्यत स्वावलंबी, स्वयंपूर्ण व स्वयंशासित बनत नाही, तोपर्यंत देशाचा विकास झाला आहे.' असे आपल्याला म्हणता येणार नाही. असे महात्मा गांधी म्हणत असत. भारत देशाला स्वातंत्र्य मिळवून ७३ वर्षे झाली आहेत. तरी देखील आपण ग्रामीण भागाला सिंचन, पिण्याचे पाणी, वीज, आरोग्य, शिक्षण आदी मूलभूत सुविधा देऊ शकलो नाही. हे कटुसत्य आहे. तोट्यात चाललेला शेतीउदयोग, वाढत चाललेल्या शेतकरी आत्महत्या, दारिद्र्यरेषेखालील लोकांची संख्या, बेरोजगारी, स्थलांतर यामुळे खेड्यांमध्ये वयोवृद्ध कुटुंबांचाच भरणा अधिक आहे. हे असेच चालू राहिले तर शहरे विरुद्ध खेडी अशी परिस्थिती निर्माण होईल व हा असमतोल देशाला परवडणारा नाही. कोरोना महामारीच्या काळात हे सिद्धही झाले आहे.

### ◈ गावपुढारऱ्यांना प्रशिक्षणाची गरज :—

निवडून आलेल्या सर्व नवनिर्वाचित गावपुढाऱ्यांना स्वत:ला प्रशिक्षित करुन घेण्याची गरज आहे. ग्रामपंचायत कायदा, ग्रामपंचायत सदस्यांचे अधिकार, कर्तव्य, जबाबदाऱ्या, स्वनिधी, ग्रामसभा, बैठका, शासनाच्या विविध योजना, ग्रामविकास आराखडा याबाबत शासनाचा संबंधित विभाग प्रशिक्षणाचे आयोजन करीलच परंतु आपण केवळ त्याच्यावर अवलंबून न राहता वर्तमानपत्रे, संबंधित पुस्तके, युट्यूब अशा माध्यमातून अधिक माहिती घ्यावी. आदर्श गाव, जिल्हा, तालुका स्तरावरील विविध ग्रामविकासविषयक विभागाला प्रत्यक्ष भेट दयावी. शाश्वत ग्रामविकासाची दिशा त्वरित निश्चित करावी. स्वत:ला स्वयंसिद्ध करावे. आपण जर स्वत:ला सिद्ध केले नाही तर खेड्यापाड्यात गावचा जो ग्रामसेवक असतो. त्याची मनमानी चालते. विशेषत: महिला सदस्य प्रशिक्षणापासून वंचित राहतात. पर्यायाने त्या ग्रामविकास प्रक्रियेपासूनही दुर्लक्षित राहतात. यासाठी महिलांनी सक्रिय पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे.

### ◈लोकसहभागातून शाश्वत ग्रामविकासाचा आराखडा तयार करावा:—

सध्याचे आपले गाव व पाच वर्षानंतरचे आपले आदर्श गाव कसे राहील? असे चित्र डोळ्यासमोर ठेवून लोकसहभागातून शाश्वत ग्रामविकासाचा आराखडा तयार करावा. त्यासाठी आपल्या गावाची बलस्थाने ओळखून नियोजन करावे. उदा. गावची नैसर्गिक संसाधने, गावातील सर्व घटक, उपलब्ध सर्व आर्थिक स्त्रोत, सर्व शासकीय योजना आणि गावच्या गरजा यांचा प्रथमत: ताळमेळ घालावा. त्यानंतर गावच्या विकासाचा पंचवार्षिक ग्रामविकास आराखडा बनवावा. हे सर्व करत असतांना लोकांचा सक्रीय सहभाग मिळवावा. तसेच वित्तीय तूट भरुन काढण्याचे पर्यायी अनेक मार्ग आहेत. जसे आमदार निधी, जिल्हा परिषद सदस्य निधी, पंचायत समिती सदस्य निधी, स्वनिधी, सीएसआर इत्यादी होय. आराखड्यातून गावचा एकात्मिक सर्वांगीण विकास साधला जावा. उदा. शेती, पाणी, शिक्षण, आरोग्य, मूलभूत सुविधाविषयक विकास कसा होईल? हे पाहणे आवश्यक आहे.

### ◈शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे गरजेचे:—

शासनाच्या जवळ—जवळ अकराशे चाळीस योजना आहेत. या योजनांची माहिती ज्या गावच्या पुढाऱ्यांना आहे. त्यांचे काम चांगले झाले आहे. उदाहरणार्थ पाणी हा एकच विषय घेतल्यास, वसुंधरा एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकास प्रकल्प, आदर्श गाव योजना, पंतप्रधान कृषी सिंचन योजना, महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना, गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार, मागेल त्याला शेततळे, ठिबक, तुषार, अटल भुजल, जलजीवन मिशन, मुख्यमंत्री पेयजल योजना, कृषी, जीएसडीए, वनीकरण विभागाच्या अनेक योजना, जलसंपदा, सिंचन, जिल्हा परिषद जलसंधारण विभागाच्या अनेक योजना आहेत. आतापर्यंत महाराष्ट्रातील ज्या—ज्या गावांनी यातील काही योजनांची तेथील नेतृत्वाने प्रभावीपणे अंमलबजावणी केली आहे. त्यामुळे त्यांची प्रगती झाली आहे. हेच त्यांच्या यशाचे गमक आहे. काही गावांनी या योजनांची प्रभावीपणी अंमलबजावणी न केल्यामुळे तेथे सिंचनासाठी व पिण्याच्या पाण्याचा आजही अभाव आहे. महाराष्ट्रात पिण्याचे पाणी वेळेवर सोडणारी बोटावर मोजण्याएवढीच गावे आहेत. उर्वरीत गावे पाणी वेळेवर का ? सोडले नाही याची हजार कारणे सांगणारीच आहेत. सांगण्याचे तात्पर्य असे की, प्रत्येक समस्येवर आपल्याकडे योजना आहेत. गोरगरीबांसाठी, वंचितासाठी, गरीबी निवारणासाठी, महिलांसाठी असंख्य योजना आहेत. फक्त त्या योजना समजून घेऊन त्याची ग्रामस्तरावर प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याची गजर आहे.

### ◈ कृषी विकास हा ग्रामविकासाचा आत्मा असला पाहिजे:—

कृषी विकास हा ग्रामीण भागाच्या विकासाचा आत्मा असला पाहिजे. जागतिक कोरोना महामारीच्या काळात जगातील सर्व उद्योग बंद होते. मात्र कृषी उद्योग चालू होता. त्यामुळे कृषी उद्योगावर आधारीत शाश्वत ग्रामविकास हेच आपलं ध्येय असलं पाहिजे. यासाठी प्रथम उपलब्ध पाण्यानुसार पीकपद्धतीला प्राधान्य दिलं पाहिजे. पाण्याच्या कार्यक्षम व उत्पादक वापराकरीता वॉटर बजेट मांडण्याची आणि जमिनीचे आरोग्य राखण्याची गरज आहे. कृषी विकासासाठी सिंचन, यांत्रिकीकरण, स्मार्ट, पोकरा, विकेल ते पिकेल, शेतकरी उत्पादक कंपन्या, शेतमाल प्रक्रिया, ग्रेडींग, पॅकींग अशा अनेक योजना आहेत. परंतु तरी देखील आपण कृषीमाल उत्पादकता व प्रक्रिया याबाबत जगाच्या तुलनेने खूप मागे आहोत. उदा. ज्या गावात गुळाचे उत्पादन होते. त्या गावातील लोकांनी गुळाचाच चहा पिले पाहिजे. त्यामुळे आरोग्य चांगले राहील व गाव स्वयंपूर्ण होण्यास मदत होईल. आपली अर्थव्यवस्था सुधारण्यास हातभार लागेल. हे जर आपण केले तर शेती व्यवसाय देखील फायदयात येईल आणि महात्मा गांधींनी स्वतंत्र भारताबद्दल, स्वयंपूर्ण व स्वावलंबी खेड्यांचे जे स्वप्न पाहिले होते ते साकार होईल.

### ◈ गावाच्या नेतृत्वाने समन्वयाची भूमिका पार पाडावी:—

शासकीय यंत्रणा, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामविकासाशी संबंधित सर्व घटक यात समन्वयाचा अभाव दिसून येतो. किंबहुना ग्रामविकासातील ती एक प्रमुख समस्या आहे. त्यासाठी सर्वांनी समन्वय साधून एका विचाराने काम करण्याची गरज आहे. यासाठी ज्यांच्याकडे गावाचे नेतृत्व आहे. त्यांनी समन्वयाची भूमिका व्यवस्थितपणे पार पाडली पाहिजे.

### ◈ माझा अनुभव :—

आम्ही ग्रामविकास संस्थेच्या माध्यमातून लोकसहभागाद्वारे मराठवाड्यातील पन्नास गावे जलसमृद्ध केलेली आहेत. यातील बारा गावे औरंगाबाद तालुक्यातील चित्ते नदी खोऱ्यात आहेत. महाराष्ट्र शासनाचा महत्त्वाकांक्षी व्हीएसटीएफ प्रकल्पाच्या माध्यमातून आम्ही चित्ते नदी खोऱ्यातील आठ गावांत शासनाच्या विविध योजनेच्या समन्वयाने एकात्मिक शाश्वत ग्रामविकासाचा प्रकल्प राबविला. या गावांमध्ये आम्ही ग्रामविकास समन्वय समितीचा प्रयोग राबविला. या समितीमध्ये सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक, तलाठी, कृषीसहाय्यक, रोजगार सेवक, मुख्याध्यापक, अंगणवाडी ताई, आशावर्कर, लाईटमॅन, पशुवैद्यकीय अधिकारी, पोलीस पाटील, स्वस्त धान्य दुकानदार आदींचा समावेश होता. प्रत्येक गावच्या ग्रामविकास समन्वय समितीची मासिक बैठकीची तारीख, वेळ, स्थळ निश्चित केलेले होते. त्यामुळे ग्रामस्थांच्या समस्या या जागेवरच सुटत. याशिवाय समन्वयाने गाव विकासालाही गती मिळाली. त्यामुळे दोन वर्षांमध्ये आठ गावांत एकात्मिक ग्रामविकासाची अठरा कोटींची कामे होऊ शकली. त्याचा परिणाम असा झाला की, शेतकऱ्यांचे उत्पन्न दीड—दोन पटीने वाढले. परिणामी स्थानिकांना गावपातळीवर रोजगार उपलब्ध झाला. 'ग्राम समन्वय समिती' ही समस्या निवारणाची व शाश्वत ग्रामविकासाची प्रभावी यंत्रणा बनली. असं प्रत्येक गावांत घडावं अशी अपेक्षा आहे.

### ◈ लोकचळवळ :—

जन, जल, जंगल, जमिन, जनावरे या नैसर्गिक संसाधनांचे आधुनिक तंत्राद्वारे व्यवस्थापन व नसबंदी, नशाबंदी, चराईबंदी, कुऱ्हाडबंदी, लोटाबंदी या पंचसूत्रीचे पालन करुन महाराष्ट्रातील अनेक गावे 'आदर्श गाव' बनलेली आहेत. याशिवाय शाश्वत ग्रामविकासाची लोकचळवळ व्हावी म्हणून शासनाने ●संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान, ●फुले—शाहु—आंबेडकर दलित वस्ती सुधार योजना पुरस्कार, ●महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, ●कौशल्य व उद्योजकता विकास अभियान ●संत तुकाराम वनग्राम पुरस्कार ●सावित्रीबाई फुले स्वच्छ अंगणवाडी पुरस्कार, ●पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम पुरस्कार, ●उत्कृष्ट पाणी व्यवस्थापन पुरस्कार, ●पंचायतराज, आदर्श गाव असे अनेक प्रकारचे अभियान सुरु केलेले आहेत. विविध योजना, अभियान, मनरेगा, स्वनिधी याद्वारे कित्येक कोटी रुपयांचा निधी प्रत्येक गावासाठी शासनाने उपलब्ध करुन दिलेला आहे. आता फक्त गावविकासासाठी निधी मिळविण्यात गावपुढाऱ्यांनी पुढाकार घेण्याची शाश्वत ग्रामविकासाची लोकचळवळ गावागावात रूजविण्याची आवश्यकता आहे. महाराष्ट्राने पंचायतराज, ग्रामविकास क्षेत्रात नेहमीच देशाला मार्गदर्शक ठरेल असे काम केले आहे. एकेकाळी जागतिक व्यापारात भारताचा ३३ टक्के वाटा होता. म्हणून पुनश्चःय एकदा देशाला परमवैभवाकडे नेण्याचे मोलाचे कार्य आपल्या हातून घडो यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा!




**नरहरी शिवपुरे**
**सचिव**
**ग्रामविकास संस्था औरंगाबाद**
**मो. नं. ९८२२४३१८८७**